REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2022

# मराठी भाषा व दूरचित्रवाणी

प्रा. डॉ. ई. जा. तांबोळी
एस. एस. ए. आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, सोलापूर.

## प्रस्तावना :

### दूरचित्रवाणी म्हणजे काय?




दूरचित्रवाणी हे एक प्रभावी दृकश्राव्य प्रसारमाध्यम आहे. चित्र आणि ध्वनी यांचे विद्युत अथवा उपग्रह तंत्रज्ञानाद्वारे दूरवर प्रक्षेपण करून ते प्रेक्षकांपर्यंत पोहोचविणाऱ्या माध्यमाला दूरचित्रवाणी (Television) असे म्हणतात. माहिती, शिक्षण, मनोरंजन, संस्कृतीचा प्रसार, जनजागृती आणि सामाजिक परिवर्तन यांसाठी दूरचित्रवाणीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आजच्या डिजिटल युगात पारंपरिक दूरचित्रवाणीसोबतच स्मार्ट टीव्ही, डीटीएच, केबल नेटवर्क आणि इंटरनेट आधारित ओटीटी (OTT) सेवांमुळे या माध्यमाचा विस्तार अधिक व्यापक झाला आहे.

## दूरचित्रवाणीचा इतिहास :-

दूरचित्रवाणीच्या विकासामागे अनेक शास्त्रज्ञांचे योगदान आहे. सन १८८४ मध्ये जर्मन संशोधक पॉल निपकोव (Paul Nipkow) यांनी यांत्रिक स्कॅनिंग डिस्कचा शोध लावला. या शोधामुळे चित्रांचे प्रक्षेपण करण्याचा पाया घातला गेला. त्यानंतर जॉन लॉगी बेअर्ड (John Logie Baird) या ब्रिटिश शास्त्रज्ञाने १९२६ मध्ये यशस्वी दूरचित्रवाणी प्रात्यक्षिक सादर केले. पुढे ब्रिटिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (BBC) ने नियमित दूरचित्रवाणी प्रसारण सुरू केले. भारतामध्ये दूरचित्रवाणी प्रसारणाची सुरुवात १५ सप्टेंबर १९५९ रोजी नवी दिल्ली येथे प्रायोगिक स्वरूपात झाली. १९६५ पासून नियमित कार्यक्रमांचे प्रसारण सुरू झाले. १९७२ मध्ये मुंबई, अमृतसर आणि इतर शहरांमध्ये दूरचित्रवाणी केंद्रांचा विस्तार झाला. १९७५–७६ मध्ये 'SITE (Satellite Instructional Television Experiment)' या उपग्रह प्रकल्पाद्वारे ग्रामीण भागात शैक्षणिक कार्यक्रम पोहोचविण्यात आले. १ एप्रिल १९७६ रोजी दूरदर्शनला आकाशवाणीपासून स्वतंत्र संस्था म्हणून मान्यता मिळाली. त्यानंतर रंगीत दूरचित्रवाणी, उपग्रह वाहिन्या आणि डिजिटल प्रसारणामुळे दूरचित्रवाणी क्षेत्रात मोठी क्रांती घडली.

**दूरचित्रवाणी वरील संहितालेखन :-**

**१) साधी व सरळ भाषा -**

दूरचित्रवाणीवरील भाषा सर्वसामान्य प्रेक्षकांना सहज समजणारी असावी. कठीण, क्लिष्ट आणि अवघड शब्दांचा वापर टाळून दैनंदिन व्यवहारातील सोपे शब्द वापरावेत. उदाहरणार्थ, "क्रोधित झाले" याऐवजी "रागावले" हा शब्द अधिक समजण्यास सोपा आहे.

**२) छोटी व सुटसुटीत वाक्ये -**

दूरचित्रवाणी वरील मोठी व लांबलचक वाक्ये ऐकून समजुन घेणे अवघड जाते. हे लक्षात घेवूनच छोटी व सुटसुटीत वाक्ये लिहावीत. इंग्रजी भाषेप्रमाणे उपवाक्यांचा वापर मराठीत होऊ शकत नाही तसे केल्यास ते अवघड जाते. उदा. एखादे निवेदन सांगताना 'खालील व्यक्ती मागील दहा दिवसा पासून बेपत्ता आहेत. त्यापैकी क. अ, ब, क, अशी क्रमवारी सांगून हे कोणास अढळल्यास कृपया ... नंबरवरती संपर्क साधावा' असे म्हणण्या ऐवजी सुटसुटीत व पटकन समजण्यासाठी 'आपण यांना पाहिलात काय? असे म्हणून या... नंबर वरती संपर्क साधावा. असे म्हणणे उचित ठरेल'

**३) भाषेचा अचुक व योग्य वापर –**

दूरचित्रवाणीवर भाषेच्या संदर्भात एक विशीष्ट जबाबदारी असते. सतत कानाचर पडणारी भाषा जनतेच्या तोंडी रुळत असते म्हणून भाषेचा अचुक व योग्य वापर करण्याची जबाबदारी या प्रसार माध्यमाची असते. उदा. 'पचका होणे' ऐवजी 'फजिती होणे' असे म्हणणे उचित ठरेल.

**४) अनावश्यक तपशिल टाळणे -**

दूरचित्रवाणी वरील जो तपशिल आवश्यक नाही तो टाळायलाच हवा एखादया व्यक्तीचे पदनाम, आकडे, साल इ. चा उल्लेख आवश्यक आहे का? हे तपासुन पहायला हवे. अनावश्यक तपशिल टाळल्यामुळे संहिता व्यवस्थित होते. आणि समजायलाही सोपी जाते.

उदा. एखाद्या कार्यक्रमामध्ये काही व्यक्तीना भाषणास सुरुवात करताना व्यासपिठावरील सर्व व्यक्तींची नावे व त्यांचे पदे सांगून सुरुवात करतात. त्यापेक्षा 'आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा...... व आदरणीय व्यासपीठ 'असे म्हणणे उचित ठरेल.

**) आकडेवारी आणि कालदर्शक तपशिल योग्य पध्दतीने लिहीणे -**

दूरचित्रवाणी मध्ये आकडेवारी व कालदर्शक तपशिल सांगताना खुप काळजी घ्यावी लागते. उदा. " ७८९ रुग्णांची या शिबीरात तपासणी करण्यात आली" असे म्हणण्या ऐवजी 'सुमारे ७५० रुग्णांची' असे म्हंटले तर कळायला सोपे जाते. त्याच प्रमाणे तारीख, वार, महिना सांगताना विशेष खबरदारी घ्यावी लागते.

**दूरचित्रवाणी कार्यक्रमाचे प्रकार :-**

कोणत्याही एका सर्वसाधारण दूरचित्रवाणी वाहिनीचे कार्यक्रम तुम्ही सातत्याने पहात असेल तर लक्षात येईल की विविध प्रकारचे कार्यक्रम तिच्यावरुन सादर होतात.

**१) करमणुकप्रधान कार्यक्रम :-**

या गटात समाविष्ट होणा-या बहुसंख्य कार्यक्रमांचा प्रधान हेतू करमणुक करणे हाच असतो या मध्येही कार्यक्रमाची वर्गवारी करता येते.

**अ) मालिका -**

मालिकां मध्ये रहस्यप्रधान व भयकारक मालिका या मध्ये गुन्हयाचा शोध अथवा गुढ गोष्टींचे माणसांना नेहमीच आकर्षण वाटते ते लक्षात घेवून मालिकेची निर्मिती करतात. दुस-या प्रकारात कौटुंबीक व विनोदी मालिका बघणारा प्रेक्षक वर्ग भरपुर असल्याने निर्माते कुटुंबातील व्यक्तींच्या संघर्षाचे विस्तृत चित्रण व आयुष्यात घडणा-या विनोदी घटनांचे चित्रण केले जाते. त्यामुळे अशा मालिका लोकप्रिय होतात. दूरदर्शन वरुन आतापर्यंत दाखविल्या गेलेल्या सर्वात लोकप्रिय मालिकात 'रामायण' व 'महाभारत' यांचा समावेश होतो. पौराणिक कथा मधील वैचित्र, संघर्ष आणि प्रेक्षकाला त्याविषयी वाटणारी आत्मीयता यामुळे भारतात पौराणिक मालिका प्रसिध्द व लोकप्रिय होतात.

**ब) संगितविषयक कार्यक्रम -**

संगितविषयक कार्यक्रमामध्ये भारतीय चित्रपटातील गिते त्यांच्या लोकप्रियतेची क्रमवारी, शास्त्रीय संगित अशा प्रकारचे वेगवेगळे कार्यक्रम ठराविक दिवशी दाखविल्याने प्रेक्षक वर्ग आकर्षला जातो. त्यामुळे त्यांच्या मनात दूरचित्रवाणीची आवड निर्माण होते.

**संगितविषयक -**

एखाद्या विषयानुरुप एकाच कलावंताची, एकाच चित्रपटातील अनेक पध्दतीनी चित्रपट गीते सादर केली जातात. 'दूरदर्शन' वरील छायागीत, रंगोली चित्रहार हे चित्रपटगीतांचे कार्यक्रम विलक्षण लोकप्रिय आहेत.

**क) खेळ स्वरुपातील कार्यक्रम -**

विविध वयोगटातील, क्षेत्रातील व्यक्तीना कलागारात बोलावून त्यांच्यात विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे असे या कार्यक्रमाचे स्वरूप असते. हा कार्यक्रम अधिक आकर्षक करण्यासाठी आवर्जुन प्रसिध्द व्यक्तींचा समावेश केला जातो तसेच प्रश्नमंजुषा, बौध्दीक खेळ, अंताक्षरी, नृत्य, गायन अशा अनेक प्रकारचे खेळ स्वरुपातील कार्यक्रम दूरचित्रवाणीवर दाखविले जातात.

**२) माहिती प्रधान कार्यक्रम :-**

या गटात समाविष्ट होणा-या कार्यक्रमांचा प्रधान हेतु एखाद्या घटनेसंबंधी, विषयासंबंधी माहिती देणे हा असतो या कार्यक्रमात कल्पिताला वाव नाही तर संपुर्णपणे सत्याधारित तपशिल देण्याची जबाबदारी कार्यक्रमावर असते. बातमीपत्र हा माहितीप्रधान कार्यक्रमाचा मुख्य प्रकार आहे. तसेच माहितीपट म्हणजे प्रत्यक्ष घडलेल्या घटना नोंदविणारा दुरचित्रवाणी वरील कार्यक्रम होय.

**३) शैक्षणिक कार्यक्रम :-**

भारतात शैक्षणिक दुरचित्रवाणी कार्यक्रमांची गरज आणि उपयोगिता दोन्ही मोठ्या प्रमाणावर आहे. दूरदर्शनचा विस्तार विकेंद्रीकरण यामुळे विविध प्रादेशिक भाषात, बोलीभाषात कार्यक्रम बनविणे शक्य आहे. शैक्षणिक कार्यक्रम अभ्यासक्रमावर आधारीत असतात त्याच प्रमाणे अभ्यासक्रमा बाहेरील माहिती देणारे ही असतात. फक्त माहिती देणे हा त्यामागील उद्देश नसून प्रत्यक्ष व्यवहारात, आयुष्यात उपयोगी पडणारे कौशल्य शिकवणे हा प्रमुख उद्देश असतो. शैक्षणिक कार्यक्रमांना वाहिलेली 'ज्ञानदर्शन' ही स्वतंत्र राष्ट्रीय वाहीनी दूरदर्शनने सुरु केली आहे.

**शैक्षणिक -**

राज्यपातळीवर मराठीतुनही शैक्षणिक कार्यक्रम प्रक्षेपित होतात. शालेय विद्यार्थ्या साठी राज्य शासनाच्या 'राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था' ने तयार केलेला कार्यक्रम 'बालचित्रवाणी' या सदरात सादर केले जातात.

**दूरचित्रवाणी समाजासाठी काय करु शकते?**

दूरचित्रवाणी भिंती बाहेरील शाळा असे म्हंटले जाते समाजातल्या अनेक क्षेत्रात अनेक प्रकारच्या लोकांना जिवनोपयोगी ज्ञान हे माध्यम देऊ शकते. आणि मुख्य म्हणजे ज्ञानाची ही गंगा घरोघरी पोहचवु शकते. देशाच्या विकासा साठी या माध्यमाचा असा वापर अत्यावश्यक ठरतो कारण जगाच्या एका कोप-यातले ज्ञान थेट दुस-या कोप-यात नेवून पोहचविण्याचे सामर्थ्य या माध्यमात आहे. तसेच दृकश्राव्य स्वरुपामुळे हे माध्यम अधिकच लोकप्रिय झाले. या माध्यमामुळे आधुनिक जगाचे एक नागरिक म्हणून आपले व्यक्तीमत्व विकसित होते. चार आनंदाचे, हास्यविनोदाचे क्षण सामान्य माणसाला देणे हे सुध्दा दूरचित्रवाणीचे एक फार मोठे सामाजिक कार्यच ठरते. आजच्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्यक्ष शिक्षणातून उचलून जिवनात उतरविण्याची क्षमता या माध्यमात आहे. म्हणजेच हा परिणाम फक्त माहिती मिळवणे एवढ्या पुरता मर्यादीत रहात नाही तर त्यातून विधायक कामास प्रेरना मिळू शकते.

**समारोप :-**

या विवेचनातुन आपल्याला काही गोष्टी अशा सांगता येतील की ज्या समाजाने दुरचित्रवाणी सारखे प्रभावी माध्यम स्विकारले आहे त्या समाजाचे काही देणे या माध्यमाने द्यायला हवे. सामाजिक व सांस्कृतिक अशा दोन प्रमुख क्षेत्रात ही जबाबदारी फार मोठी आहे. म्हणून या माध्यमाचा वापर विशाल दृष्टीकोन ठेवून केलेली आशयाची मांडणी समाजाला आपले

वाटेल अशा रितीने केलेली निवड विविध प्रश्नांचे भान ही जबाबदारी या माध्यमाने उचलायची आहे तरच हे माध्यम समाजातील व्यक्तींना शाप न ठरता वरदान वाटनार आहे. व या माध्यमाचा पुरस्कार ते कानाकोप-यात करणार आहेत.

### संदर्भ ग्रंथ :-

१- माध्यम चित्रवाणी - आकाशानंद

२- नभोवाणी कार्यक्रम तंत्र आणि मंच

३- शासकीय यंत्रणा - कृ. ना. वळसंगकर.

४- मराठीतील भाषिक विचारांची वाटचाल - गं. ना. जोगळेकर.

५- निवडक लेख भाग-२ - ग. ह. खरे..

६- मराठी भाषेची घटना - रा. भि. जोशी.